# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

शासकिय तंत्र निकेतन परिसर, सदर, नागपूर.

Web Site:- www.rdtenagpur.org.in E-mail: ronagpur.dte@ gmail.com

दुरध्वनी क्रं.-२५६५१४३ फॅक्स क्रं.- ०७१२-२५६१६६३


क्रमांक :- तंशिस/प्राकाना/शैवि-२/ईबीसी/२०१३/ 492

दिनांक:- 11 FEB 2014

प्रति,

संचालक/प्राचार्य,

खाजगी विनाअनुदानित व कायमविनाअनुदानित,

पदवी, पदविका व पदव्युत्तर तस्सम संस्था,

नागपूर विभाग, नागपूर

विषय :- खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत संस्थामधील आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यांत येत असलेल्या शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के प्रतिपुर्ती योजनेच्या अंमलबजावणीसाठी ऑनलाईन प्रणाली बाबत.

संदर्भ :- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई, यांचे पत्र क्रं. १५/अर्थसं/इबीसी/ऑनलाईन/२०१३-१४/३२, दि. १९ फेब्रुवारी २०१४ रोजीचे.

उपरोक्त संदर्भांकित विषयाच्या अनुषंगाने कळविण्यांत येते की, खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत संस्थेमधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ५० टक्के फी प्रतीपूर्ती करण्याबाबत शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून ऑनलाईन प्रक्रिया राबविण्यांत आलेली आहे. सदर योजनेच्या लाभार्थी विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्यासाठी दिनांक २९ नोव्हेंबर २०१३ पर्यंत मुदतवाढ देण्यांत आली होती. तथापी काही लाभार्थी विद्यार्थ्यांचे अर्ज **तांत्रिक अडचणीमुळे अथवा अन्य कारणांमुळे ऑनलाईन प्रणालीवर भरले नाहीत. अशा लाभार्थी विद्यार्थ्यांचे विलंबाचे ठोस कारण नमुद करून संस्थेकडे प्राप्त असलेले अर्ज सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर येथे १४ फेब्रुवारी २०१४ पर्यंत जमा करावेत. या तारखेनंतर कोणत्याही कारणामुळे प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार करण्यांत येणार नाही.**

तसेच या योजनेपासून कुठलाही पात्र विद्यार्थी/विद्यार्थीनी वंचित राहणार नाही याची दक्षता संस्था प्रमुख या नात्याने प्राचार्यांनी घ्यावी.

सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर.